# विद्यार्थ्यांनी वसतिगृहात राहून स्पर्धा परीक्षेची तयारी करावी-प्राचार्य खताळ

देशोन्नती वृत्तसंकलन...

**देगलूर** ▪ पदवीचे शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी लागणारी पुस्तके ग्रंथालयात भरपूर प्रमाणात उपलब्ध आहेत. शहरातील विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा लाभ सहज घेता येतो;परंतु ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या अडचणीमुळे शहरात राहता येत नाही.अशा गरजू, अभ्यासू, होतकरू विद्यार्थ्यांनी वसतिगृहात राहून स्पर्धा परीक्षेची तयारी करावी, असे आवाहन देगलूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांनी देशोन्नतीशी बोलताना केले.

अडत व्यापारी शिक्षण संस्थेच्या देगलूर महाविद्यालयात गरजू विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह सुरू नाही, अशी चर्चा शहरात सुरू होती. या अनुषंगाने प्रत्यक्ष महाविद्यालयात जाऊन वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी दैनिक देशोन्नतीने प्राचार्य डॉ. मोहन खताळ यांची भेट घेऊन वसतिगृहा संबंधी विचारणा केली असता, प्राचार्य खताळ म्हणाले की, ग्रामीण भागातील सर्वसामान्य विद्यार्थ्यांसह शहरातील गोरगरीब विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे शिक्षण घेता यावे, यासाठी अडत व्यापारी शिक्षण संस्थेच्या संस्थापक संचालकांनी अत्यंत परिश्रमाने वर्षानुवर्ष वसतिगृह चालविले. कालांतराने वस्तीगृहासाठी स्वतंत्र इमारत बांधण्यात आली. शैक्षणिक वर्ष नुकतेच सुरू झाले असून अद्याप विद्यार्थ्यांनी वसतीगृहात राहण्यासाठी अर्ज केलेले नाहीत. त्यामुळे सध्या वस्तीगृहात विद्यार्थी नाहीत. पदवीनंतर अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षेची तयारी करतात, त्यांना अडचण येऊ नये म्हणून ग्रंथालयात स्पर्धा परीक्षेसाठी लागणारी भरपूर पुस्तके उपलब्ध करून ठेवली आहेत. त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ . मोहन खताळ यांनी केले आहे. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ.अनिल चिद्रावार, डॉ. संतोष येरावार, गोविंद जोशी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner